# पर्यायी शैक्षणिक योजना - 2021-2022

**माध्यम-मराठी महिना - ऑगस्ट इयत्ता – 7 वी**

**विषय-मराठी(प्रथम भाषा)**

| अ .नं | महिना | प्रमुख अध्ययन सामर्थ्य | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|
| 1 | ऑगष्ट- पहिला आठवडा | पद्यपाठ 1- सर्वात्मका शिवसुंदरा<br>1) परिचित पद्य वाचून त्यांचा अर्थ व सारांश समजणे. | 1)कविवर्य कुसुमाग्रज यांची फोटोसह माहिती पेपरवर लिहिणे.<br>2) "सर्वात्मका शिवसुंदरा" या प्रार्थनेच्या गायनाचा युट्युब व्हिडिओ ऐकणे.<br>https://youtu.be/ga7yo9vhhqk<br>3) विद्यार्थ्यांनी सदर प्रार्थना गायन करताना स्वत:चा व्हिडिओ बनवून वर्गाच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर पाठवणे.<br>4) कवितेतील नवीन शब्दांची यादी करून त्यांचा अर्थ शोधणे व लिहिणे.<br>5) कवितेचा भावार्थ किंवा सारांश स्वत:च्या शब्दात शिक्षकांच्या / पालकांच्या मदतीने लिहिणे. | विद्यार्थ्यांच्या गायनाचे व्हिडीओ<br>https://youtu.be/J8I7aSgtnN4 (DSERT e-samved ) |
| | | 2) पद्यावर आधारित विचारलेल्या कोण? कसे? कुठे? काय? अशा प्रश्नांची उत्तरे लिहिणे | 6) कवितेवर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे कविता वाचन करून लिहिणे.<br>7) कवितेतील लयबद्ध, प्रासबद्ध शब्द ओळखून यादी करणे. | सराव प्रश्नपत्रिका-1 (survey heart/google form/quiz ) |
| | | 3) शब्दसंग्रह करून त्यांचा वाक्यातील उपयोग समजणे. | 8) कवितेतील शब्दांना समानार्थी शब्द लिहिणे.<br><br>9) दिलेल्या शब्दांना विरुद्धार्थी शब्द शोधून लिहिणे. | https://www.liveworksheets.com/id/uv2126018ms<br>https://www.liveworksheets.com/id/md2126155qf |
| 2 | ऑगष्ट - दुसरा आठवडा | पाठ 2 रा<br>अभ्यास एक छंद<br>1) गद्य किंवा पद्य वाचून अर्थग्रहण करणे | 1) पु.ल.देशपांडे यांचा परिचय करून घेणे आणि त्यांची माहिती पेपरवर लिहिणे.<br>2) सदर पाठाचा शिक्षकांच्या आवाजातील आदर्श वाचनाचा ऑडिओ व्हिडिओऐकणे.शिक्षकांनी ऑनलाईन वर्ग घेणे.<br>3) "अभ्यास एक छंद" या पाठ वाचनाचा यूट्यूबवरील ऑडिओ ऐकणे.<br>https://youtu.be/oovdGC63wNQ<br>4) विद्यार्थ्यांनी पाठाच्या वाचनाचा व्हिडीओ बनवून पाठवणे . | https://youtu.be/8MzoDs0QwLQ (DSERT e-samved ) |

| अ न | महिना | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
| --- | --- | --- | --- | --- |
| | ऑगष्ट – दुसरा आठवडा | दिलेल्या गद्य/पद्य /घटना /कथा यांचे अर्थग्रहण करून प्रश्नांची उत्तरे लिहिणे . | 5) शिक्षकांनी विचारलेल्या/ दिलेल्या प्रश्नाचे वाचन करून पाठातील त्यांची उत्तरे शोधून लिहिणे .<br>6) पाठातील वाक्ये अपूर्ण स्वरुपात देऊन विद्यार्थ्यांकडून पूर्ण स्वरुपात लिहून घेणे .<br>7) "माझा आवडता छंद" ह्याविषयी विद्यार्थ्यांकडून 10 ओळी त्यांच्या शब्दात लिहून घेणे . | सराव प्रश्नपत्रिका- 2<br><br>अपूर्ण वाक्ये पूर्ण करा (google form/quiz, surveyheart,kahoot,liveworksheet च्या माध्यमातून )<br><br>योजना कार्य |
| | | क्रियाविशेषणाविषयी माहिती घेणे . | 8) काही वाक्ये देऊन त्यातील क्रियापदाला 'कसा,केंव्हा ,कुठे, कशी' हे प्रश्न विचारून आलेले उत्तर क्रियाविशेषण असते , हे समजून घेणे.<br>9) सदर पाठातील क्रियाविशेषण असलेली वाक्ये शोधून लिहून क्रियाविशेषणाला अधोरेखित करणे . | क्रियाविशेषण असलेली वाक्ये (google form /quiz, )<br>https://www.liveworksheets.com/xm2129637ea<br><br>योजना कार्य |
| | | 4) शब्दसंग्रह वाढविणे . | 10) दिलेल्या शब्दाला योग्य विरुद्धार्थी शब्द लिहिणे .<br>11) दिलेल्या शब्दांचे लिंग बदलून लिहिणे व अशा शब्दांची यादी करणे .<br>12) पाठातील वाक्प्रचाराची यादी करून त्यांचे अर्थ समजावून घेवून वाक्यात वापरणे . | Google forms/quiz , survey heart , kahoot,liveworksheet च्या माध्यमातून |
| 3 | ऑगष्ट – तिसरा आठवडा | 1) दिलेल्या गद्य/पद्य यांचा अर्थग्रहण करून प्रश्नांची उत्तरे देणे . | 1)रघुनाथ माशेलकरांचा जीवन परिचय करून घेणे .<br>2) पाठाचे वाचन करून शिक्षकांनी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहिणे .<br>3) पाठात आलेली विविध वाक्ये दिली असता ती कोणी ,केंव्हा,कोणास म्हटले ते लिहिणे .<br>4) पाठाचे वाचन करून दिलेली अपूर्ण वाक्ये पूर्ण करणे . 5) शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहिणे. | https://youtu.be/wCTApk4l5Yk (DSERT e-samved)<br>सराव प्रश्नपत्रिका -3<br><br>Google forms/quiz , survey heart , kahoot,liveworksheet च्या माध्यमातून |

| अ.न | महिना | प्रमुख अध्ययन सामर्थ्ये | अध्ययन कृती | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|
| | | 2) दिलेल्या विषयावर स्वत:च्या शब्दात लेखन करणे .<br><br>3) शब्दयोगी अव्ययाविषयी अधिक माहिती घेणे . | 1) माझे बाबा 2) माझी आई 3) माझा आवडता प्राणी या प्रत्येक विषयावर स्वत:च्या शब्दात प्रत्येकी दहा ओळी लिहिणे .<br>1) दिलेल्या वाक्यातील नाम व सर्वनाम ओळखून त्यांना जोडून आलेल्या शब्दांना अधोरेखित करणे .<br>2) शब्दयोगी अव्यय असलेली पाठातील वाक्ये शोधून लिहिणे . | योजना कार्य<br><br>योजना कार्य आणि शब्दयोगी अव्यायावर आधारित survey heart , google forms,live worksheet |
| 4 | ऑगष्ट – चौथा आठवडा | पद्यपाठ 4 : जिंकू आम्ही लढाई<br>1)कविता,कथा,नाटक,निबंध ह्यांचे श्रवण करून अर्थ समजून घेणे.<br><br>2)कवितेचा सारांश लिहिता येणे. | 1) शिक्षकांनी सदर कवितेचे आदर्श वाचन ऑनलाईन वर्गाद्वारे करून किंवा व्हिडीओ / ऑडीओ बनवून मुलांना ऐकविणे. मुलांनी ऐकून अर्थ समजून घेणे .<br>2) शिक्षक/ पालक ह्यांच्या मदतीने कवितेचा सारांश स्वत:च्या शब्दात लिहून वाचन करणे .<br>3) कवितेचे श्रवणं आणि वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहिणे.<br>4) देशासाठी बलिदान दिलेल्या 2 देशभक्तांची सचित्र माहिती मिळवून लिहिणे. | https://youtu.be/2A5xLwcia88 (DSERT e-samved lesson )<br><br>प्रश्नावली-4 / survey heart ,google forms,<br><br>योजना कार्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 3)वाक्प्रचार ,म्हणी, समानार्थी शब्द ह्यांचा संग्रह करून अर्थ समजून घेणे. | 5) वाक्प्रचार दिले असता त्यांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करणे.<br>6) दिलेल्या शब्दसमुहाबद्द्ल एक शब्द लिहिणे.<br>7) दिलेल्या शब्दांना समानार्थी शब्द लिहिणे.<br>8) कवितेतील लयबद्ध शब्दांची यादी करून वाचन करणे. | Survey heart ,google forms /quiz |

**सराव प्रश्नपत्रिका -1 (नमुन्यादाखल )**

**प्रश्न 1ला - खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**1)सर्वात्मका असे कोणाला म्हटले आहे?**

**उत्तर-** ______________________________________________

**2)ईश्वर कोणाची आसवे पुसतो?**

**उत्तर-** ______________________________________________

**3)ईश्वर कोठे कोठे आहे असे कवीला वाटते?**

**उत्तर-** ______________________________________________

**4)न्यायासाठी लढणाऱ्याना ईश्वर काय देतो?**

**उत्तर-** ______________________________________________

**5)कवीने प्रभूला कोणती विनंती केली आहे?**

**उत्तर-** ______________________________________________

**प्रश्न 2रा - खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.**

1) **सुमनात तू .....................................**

**.......................................................**

**.......................................................**

**.........................................वसतोस तू**

2) **करुणाकरा .........................................**

..............................................................

..............................................................

.................................................... पावले

प्रश्न 3 रा .   खालील प्रश्नाची उत्तरे लिहा.

1) कुसुमाग्रजांचे पूर्ण नाव काय ?

उत्तर : ____________________________________________

2) कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पारितोषिक केंव्हा मिळाले ?

उत्तर :____________________________________________________

प्रश्न :   पुढील समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| अंधार | नभ , गगन |
| प्रकाश | तिमिर , काळोख |
| आकाश | उजेड , तेज |
| अश्रू | देव , ईश्वर |
| दिवा | कष्ट ,मेहनत |
| सुमन | आसवे , आसू |
| प्रभू | दीप , दीपक |
| पद | फूल , पुष्प |
| श्रम | पाय , पाऊल |

प्रश्न : खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द वरील यादीतून निवडून योग्य जोडी तयार करा .

विसंवाद भ्याड नावड

थोर निर्भय शत्रू

अयशस्वी शेवट

**आवड**

**भय**

**यशस्वी**

**सान**

**मित्र**

**धाडसी**

**संवाद**

**आरंभ**

## सराव प्रश्नपत्रिका 2

**प्रश्न 1 ला : खालील प्रश्नांची उत्तरे लिहा .**

1) पुस्तक मित्रासारखे केंव्हा वाटते?

_______________________________________________

_______________________________________________

2) इंग्रजी विषयाशी दोस्ती केंव्हा जमेल ?

_______________________________________________

_______________________________________________

3) अभ्यासाला 'एक छंद' असे का म्हटले आहे ?

_______________________________________________

_______________________________________________

**प्रश्न 2 रा : पाठाचे वाचन करून खालील वाक्ये पूर्ण करा –**

1) पोहता न येणाऱ्या मुलांना ..................................................

2) एक-एक शब्द गोळा करत गेलात, की पहा तुमची ................................................

3) अभ्यास हा सुद्धा ...............पाहिजे.

4) पुस्तकाशी मैत्री केली तर ...........................................................

5) एखाद्याशी मैत्री जमविण्याचा उत्तम उपाय म्हणजे आपण

..........................................................................................................................

6) मग एक कविता आवडली की ................................................................................

प्रश्न 4 था : खालील  वाक्ये वाचून प्रथम क्रियापद ओळख. त्या क्रियापदाला

'कसा,केंव्हा,कोठे,कशी' असे प्रश्न विचारून आलेल्या उत्तराला अधोरेखित करणे.

1) हत्ती हळूहळू चालतो.

2) आम्ही काल गावी गेलो होतो .

3) पाऊस मुसळधार पडत आहे .

4) सध्या कोरोनाची भयंकर साथ चालू आहे .

5) शाळेच्या आस-पास खूप झाडे आहेत.

6) पावसाळ्यात रस्त्यावरून सावकाश चालावे .

7) आजकालची मुले मोबाईल सहज हाताळतात .

8) अचानक पोटा दुखत असल्यास डॉक्टरांना संपर्क करा.

9) पाऊस केंव्हा पडेल हे सांगत येत नाही .

10) येथे पाणी  का नाही ?